पुढारी MY कोल्हापूर शनिवार, १५ फेब्रुवारी २०२५

# विवेकानंद महाविद्यालयात मंगळवारी आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाच्या वतीने मंगळवारी (दि. १८) विवेकानंद कॉलेजच्या ग्रंथालय सभागृहामध्ये सकाळी ९.३० वाजता चौथ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाचे उद्घाटन शिक्षणतज्ज्ञ व लेखक प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांच्या हस्ते व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. प्रथम सत्रात युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक नवनाथ गोरे यांची प्रकट मुलाखत होणार आहे. दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. भीमराव धुळूबुळू यांच्या अध्यक्षतेखाली युवा कविसंमेलन होणार आहे. साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष विद्यार्थी प्रतिनिधी निधी कुलकर्णी असणार आहे. विद्यार्थी, प्राध्यापक व साहित्यिक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, संमेलनाचे समन्वयक डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले.

पुढारी संमिश्र कोल्हापूर, शनिवार, १५ फेब्रुवारी २०२५

# अ. भा. आंतरविद्यापीठ आईस स्टॉक स्पर्धेत विवेकानंद कॉलेजचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कश्मीर गुलमर्ग येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ आईस स्टॉक स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूरच्या गायत्री लोळगे, वैष्णवी पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाकडून प्रतिनिधित्व करत आईस स्टॉक खेळामध्ये टीम टार्गेट व टीम डिस्टन्स खेळ प्रकारात सुवर्णपदक मिळविले. स्पर्धांसाठी भारतामधून विविध विद्यापीठातून ४५ विद्यापीठांचा समावेश होता.

यशस्वी खेळाडूंना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार आर. बी. जोग व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.